I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 154 Cr.P.C.)

प्रथम खबर अहवाल

(फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम १५४ अन्वये)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S. (पोलीस ठाणे):** मुलचेरा **Year (वर्ष):** 2022

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0063 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/09/2022 21:06 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 17/08/2022 **Date To (दिनांक पर्यंत):** 29/09/2022

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 15:25 तास **Time To (वेळेपर्यंत):** 17:45 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 29/09/2022 **Time (वेळ):** 21:06 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 025 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 29/09/2022 21:06 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 0.500 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** आरोपीचे राहते घर, विवेकानंदपुर,मुलचेरा

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):** (महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** राजेश गुरूदेव तांती

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1988 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):** ठेकेदार

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | विवेकानंदपुर, मुलचेरा, मुलचेरा, गडचिरोली, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | विवेकानंदपुर, मुलचेरा, मुलचेरा, गडचिरोली, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 0

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती भावना शैलेन मिस्त्री | | | 1. Town/Village (शहर / गाव): विवेकानंदपुर,Tehsil (तहसील): मुलचेरा,Police Station (पोलीस ठाणे): मुलचेरा,District (जिल्हा): गडचिरोली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| | | | | |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

नक्कल फिर्याद

पोलीस स्टेशन - मुलचेरा

दिनांक - 29/09/2022

मी श्री राजेश गुरूदेव तांती, वय 34 वर्षे, जात - बंगाली, धंदा - शेती व ठेकेदारी रा. विवेकानंदपूर ता. मुलचेरा जि. गडचिरोली येथे राहत असुन दिनांक 17/08/2022 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथे फोनव्दारे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याबाबत माहिती दिली.

त्यानुसार दिनांक 17/08/2022 रोजी पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली हे स्टाफसह शासकीय वाहनाने मौजा मुलचेरा येथे आले, त्यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

सन 2020-2021 मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ग्रामपंचायत विवेकानंदपूर येथे सुकदेव हरेकृष्ण दास ते सपन मोहिनी शर्मा यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोड बांधकामाचे वर्क आर्डर दिनांक 15/03/2022 रोजी ग्रामपंचायत विवेकानंदपूर यांनी सदर रोड बांधकामाचा ठेका श्री. किर्तीवास केशव घरामी यांना दिले. त्यांनी सदर रोड बांधकामाचे काम करण्यास सांगितले. त्यानुसार सदर सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम मी पुर्ण करुन कामाचे देयके श्री किर्तीवास घरामी यांचे नावे ग्रामपंचायत विवेकानंदपुर येथे सादर केले होते.

सिमेंट कॉंक्रीट रोडचे बांधकाम श्री. किर्तीवास केशव घरामी यांचे मार्फतीने मी पुर्ण केल्याने, त्या बांधकामाचे बिलाबाबत मी 7 ते 8 दिवसापुर्वी ग्रामपंचायत विवेकानंदपूर येथे जावून श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच यांना विचारणा केली. तेव्हा त्या म्हणाल्या की, "आपण श्री. किर्तीवास केशव घरामी यांचे नावाने केलेल्या कामाचे बिल जिल्हा परीषद येथून मंजूर झालेले आहे. तुम्हाला चेक लवकर पाहिजे असेल तर तुम्हाला आमचे काम करावे लागेल, तुमचे 4,98,000/-रू. व 1,26,000/- रू. असे एकूण 6,24,000/-रूपयाचे दोन चेक मंजूर आहेत. त्याप्रमाणे मला 5 टक्के प्रमाणे 31,200/- रूपये द्यावे लागेल. तरच मी तुमचे चेकवर सही करून तुम्हाला चेक देणार." तेव्हा मी श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच यांना 5 टक्के म्हणजे खूप जास्त होतात. काही कमी करा, माझ्याकडे आता एवढे पैसे नाहीत, असे म्हणालो. तेव्हा त्यांनी "तुला 5 टक्के प्रमाणे 31,200/-रूपये द्यावेच लागेल, नाही तर श्री. किर्तीवास घरामी यांचे कामाचे चेक तुला लवकर मिळणार नाही" असे म्हणाली. त्यावर मी घाबरून त्यांना "ठिक आहे, पैसे जमल्यानंतर आपणांस येवून भेटतो, तेव्हा त्यांनी "ठिक आहे, देषबंधुग्राम रोडला असलेल्या नाग मंदीर येथे दुपारून भेटण्यास ये" असे म्हणून मला पैशाची मागणी केली आहे.

श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच, ग्रामपंचायत विवेकानंदपूर यांनी मला सुकदेव हरेकृष्ण दास ते सपन मोहिनी शर्मा यांचे घरापर्यंत सिमेंट कॉंक्रीट रोडचे केलेल्या बांधकामाचे चेक देण्याकरीता 5 टक्के प्रमाणे 31,200/- रु. (एकतीस हजार दोनषे रुपये फक्त) लाच रक्कमेची मागणी केलेली असून त्यांना 5 टक्के प्रमाणे 31,200/-रू. लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने मी 31,200/- रू. घेऊन आपले कार्यालयामार्फत कार्यवाही होणेकरीता स्वेच्छेने लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली कॅम्प मुलचेरा येथे तक्रार दिली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टाफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. श्री. श्रीधर भोसले यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी लेखी दिलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी दिलेल्या सुचनेवरून नापोशि श्रीनिवास

संगोजी यांनी व्हाईस रेकार्डर कशाप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हाईस रेकार्डरद्वारे रेकार्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 31,200/-(रू. 500/- दराच्या 62 चलनी नोटा व 200/- रू. दराची 1 नोट ) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म सांगीतले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रासिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कारवाई करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन त्यांचे सुचनेवरून नापोशि श्रीनिवास संगोजी यांनी व्हाईस रेकार्डर सुरू करून व्हाईस रेकार्डवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकार्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच, ग्रामपंचायत विवेकानंदपूर यांना भेटण्यासाठी आम्ही थांबुन असलेल्या मौजा मुलचेरा येथील वनविभाग विश्रामगृह येथुन देषबंधुग्राम रोडला असलेल्या नाग मंदीर येथे जाण्यास मी आणलेल्या दुचाकीने रवाना केले. पडताळणी दरम्यान श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच, ग्रामपंचायत विवेकानंदपूर यांनी देषबंधुग्राम रोडला असलेल्या नाग मंदीर येथे भेटुन, त्यांनी मला ग्रामपंचायतला केलेल्या कामाचे 5 टक्के प्रमाणे 31,200/- रु. लाच रकमेची मागणी करुन तडजोडीअंती 3 टक्के प्रमाणे 18,000/- लाच रक्कम आज किंवा उद्या आणुन दया." असे म्हणाले तेव्हा मी "मॅडम, जमणार नाही, मी पैषाची अरेंजमेंट करून तुम्हाला फोन करतो." असे म्हणाले, तेव्हा श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच, यांनी " ठिक आहे, पाहून घ्या तुमचे" असे म्हणाल्याने पंच क्रं. 1 सह नियोजीत ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात वाचन करून व्हाईस रेकार्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हाईस रेकार्डमध्ये झालेले संभाषण ऐकुन व पंच क्र.1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच, ग्रामपंचायत विवेकानंदपूर यांनी ग्रामपंचायतला केलेल्या कामाचे 5 टक्के प्रमाणे 31,200/- रु. लाच रकमेची मागणी करुन तडजोडीअंती 3 टक्के प्रमाणे 18,000/- लाच रक्कम पैषाची अरेंजमेंट करून फोन केल्यानंतर स्विकारण्याची तयारी दर्षविल्याची खात्री केल्याने, मला पंचासमक्ष अँथ्रासिन पावडर लावलेल्या नोटांचा सिलबंद लिफापा फोडून त्यातील 13,200/- रु. मला वेळीच परत केले व रु. 18,000/- लाचेची रक्कम लिफाप्यात सिलबंद करून आपले ताब्यात ठेवले.त्यावरून श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच, ग्रामपंचायत विवेकानंदपूर यांचे विरुध्दसापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. पडताळणी व सापळा स्थगीती कारवाई बाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.

श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी दि. 29/08/2022 रोजी सापळयाचे आयोजन केले.

त्याप्रमाणे गै.अ. श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच विवेकानंदपुर यांना लाचेमध्ये देण्याकरीता मी जमा केलेल्या रक्कमेचा सिलबंद लिफापा दोन्ही पंचाचे समक्ष आपले सुचनेवरुन चापोहवा तुळषिराम नवघरे यांनी फाडून त्यांतील अँथ्रासिन पावडर लावलेली 18,000/-रू. लाचेची रक्कम माझे जिन्सपॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात अलगद ठेवुन दिली. त्यानंतर पंचनामा क्रं. 2 मधील सुचना पुन्हा समजावुन अँथ्रासिन रेकार्डर मध्ये मेमरी कार्ड टाकून व्हाईस रेकार्डर सुरू करून व्हाईस रेकार्डवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकार्डडर माझे ताब्यात देवुन चालु स्थितीत ठेवून गै.अ. श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच यांना फोन लावले तेव्हा गै.अ. श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच यांनी "मै ग्रामपंचायत मे आउंगी तब आना" असे बोलले परंतू मला गैरअर्जदाराचे फोनवरील संभाशण समजून न आल्याने, मी व पंच क्र.1 यांचे सह गै.अ. यांचे घरी लाच रक्कम देण्याकरीता रवाना झालोत. गै.अ. श्रीमती भावना मिस्त्री ही घरी हजर मिळुन आली. तिचे सोबत कामासंबधी बोलणी केली असता, "कल ग्रामसभा है. कल का दिन जाने दो परसो चेक लेके जाना" असे बोलली. त्यामुळे पंच क्रं. 1 व मी आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो व घडलेलेली हकीकत सांगीतली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी यांनी सापळा स्थगीती पंचनामा क्रं. 3 मध्ये घेतल्या आहेत.

श्री. श्रीधर भोसले, पोलीस निरीक्षक यांनी दि. 01/09/2022 रोजी सापळयाचे आयोजन केले. त्याप्रमाणे गै.अ. श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच विवेकानंदपुर यांना लाचेमध्ये देण्याकरीता मी जमा केलेल्या रक्कमेचा सिलबंद लिफापा दोन्ही पंचाचेसमक्ष आपले सुचनेवरुन पोना किषोर जौजारकर यांनी फाडून त्यांतील अँथ्रासिन पावडर लावलेली 18,000/-रू. लाचेची रक्कम माझे जिन्सपॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिशात अलगद ठेवुन दिली. त्यानंतर पंचनामा क्रं. 2 मधील सुचना पुन्हा समजावुन व्हाईस रेकार्डर मध्ये मेमरी कार्ड टाकून व्हाईस रेकार्डर सुरू करून व्हाईस रेकार्डवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकार्डर माझे ताब्यात देवुन चालु स्थितीत ठेवून गै.अ. श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच यांना फोन लावले तेव्हा गै.अ. श्रीमती भावना मिस्त्री, सरपंच हिचे पतीने फोन उचलुन, फोन मॅडमकडे नसुन मॅडम घरी आहे असे सांगीतले. तेव्हा मी व पंच क्र.1 यांचे सह गै.अ. यांचे घरी लाच रक्कम देण्याकरीता रवाना झालोत. गै.अ. श्रीमती भावना मिस्त्री ही घरी हजर मिळुन आली. तिचे सोबत कामासंबधी बोलणी केली असता, तिने 4,98,686/- रू. चेक देवुन, नंतर भेट असे हातवारे करून सांगीतले. त्यामुळे पंच क्रं. 1 व मी सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो व घडलेली हकीकत सांगीतली. याबाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी यांनी सापळा स्थगीती पंचनामा क्रं. 4 मध्ये घेतल्या आहेत.

आज दि. 29/09/2022 रोजी पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांना मौजा मुलचेरा येथे येण्याबाबत कळविल्याने,लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोलीस निरीक्षक श्री श्रीधर भोसले साहेब, शासकीय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने मौजा मुलचेरा येथील वनविभागाचे विश्रामगृह येथे पोहचले व तिथे मला बोलावून घेतले.

त्यानंतर आम्ही दिनांक 29/08/2022 व दिनांक 01/09/2022 रोजी असे दोनदा लाच रक्कम देण्याकरीता गेलो असता, गै.अ. श्रीमती भावना मिस्त्री सरंपच हिला कोणत्यातरी कारणास्त्तव संषय

आल्याने त्यांनी माझे कडुन पैसे घेतले नाही व बांधकामाचे 4,98,686/-रूपयाचे चेक देवुन दुसऱ्या दिवशी पासुन बाहेरगावी निघुन गेल्याने यापुढे श्रीमती भावना मिस्त्री ही माझेकडुन पैषाची मागणी करणार नाही व माझेकडुन पैसे घेणार नाही अशी माझी खात्री झाल्याने निवेदन सादर केले आहे.

तरी दिनांक 17/08/2022 रोजी झालेल्या पडताळणी कारवाई दरम्यान गै.अ.श्रीमती भावना शैलेन मिस्त्री, वय 30 वर्षे, पद सरपंच, ग्रामपंचायत विवेकानंदपुर ता. मुलचेरा जि. गडचिरोली सरंपच हिने सुकदेव हरेकृष्ण दास ते सपन मोहिनी शर्मा यांचे घरापर्यंत सिमेंट कांक्रीट रोडचे बांधकामाचे 4,98,000/-रू. व 1,26,000/- रू. असे एकूण 6,24,000/-रूपयाचे दोन चेक मंजूर करून देण्याचे कामा करीता 5 टक्के प्रमाणे 31,200/- रूपयाची मागणी करून तडजोडीअंती 3 टक्के प्रमाणे 18,000/- रू. लाच रक्कमेची मागणी केल्याने तिचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यानुसार कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढुन मला वाचुन दाखविली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

(1) **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** ashok sanjay bhapkar (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिकाऱ्याचे नाव): Rank (हुद्दा):**

**No. (क्र.): to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला): or (किंवा)**

(4) **Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा): on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

प्रभारी अधिकारी
पोलीस स्टेशन, मुलचेरा

Name (नाव): ashok sanjay bhapkar

Rank (हुद्दा): I (Inspector)

No. (क्र.):

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

पोलीस स्टेशन मुलचेरा जि. गडचिरोली

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**